# समिती दर्पण

जानेवारी २०२५

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात सुमारे ११०० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# मुलींच्या वसतिगृह इमारतीला दानशूरांचे पाठबळ

## तीन मजल्यांचे व संगणक कक्षाचे देणगीदारांच्या हस्ते उद्घाटन

ग्रामीण भागातून पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. अशा होतकरू आणि गरजू मुलींकरता विद्यार्थी साहाय्यक समितीने फेब्रुवारी २०२२ मध्ये लजपत भवन संकुल परिसरात नवीन वसतिगृहाचे काम सुरू केले. देणगीदारांच्या मदतीवर आणि विश्वासावर या वसतिगृहाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण झाले. या वसतिगृहात जून २०२४ च्या सत्रात प्रवेश देण्यात आले. देणगीदारांच्या मदतीतून उभारलेल्या तीन मजल्यांचे व संगणक कक्षाचे उद्घाटन २६ जानेवारीला झाले.

वसतिगृहाच्या दुसऱ्या मजल्याला कै. श्रीमती पुष्पलता नितीन कारिआ यांचे नाव देण्यात आले असून देणगीदार बांधकाम व्यावसायिक नितीन कारिआ यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. तिसरा मजल्यासाठी मराठवाडा मित्रमंडळाने देणगी दिली असून त्याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव गणगे, कार्याध्यक्ष आणि समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव आणि पदाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले. प्रीती आणि जय राव यांनी दिलेल्या देणगीतून चौथ्या मजल्याचे काम झाले असून त्या दोघांच्या हस्ते या मजल्याचे उद्घाटन झाले. त्याचप्रमाणे कै. विजया सहस्त्रबुद्धे आणि कै. अमोघ दाते यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या संगणक कक्षाचे उद्घाटन श्री. परशुराम दाते यांच्या हस्ते झाले.



*मुलींच्या नवीन वसतिगृहातील तीन मजले व संगणक कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्यासह देणगीदार आणि मान्यवर.*

### योगा हॉल, आरोग्य केंद्राचे नवीन वसतिगृहात उद्घाटन

मुलींच्या नवीन वसतिगृहात अमेरिकास्थित अनिल व प्रेमा गोगटे यांच्या देणगीतून साकारलेल्या योगा हॉल आणि आरोग्य केंद्राचे उद्घाटन २ जानेवारीला झाले. या कार्यक्रमाला गोगटे दांपत्यासह त्यांची कन्या, जावई व दोन नाती उपस्थित होत्या. आरोग्य केंद्राला गोगटे यांच्या भगिनी डॉ. लिलावती यांचे नाव देण्यात आले आहे. यावेळी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, विश्वस्त डॉ. मकरंद फडके, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर उपस्थित होते.

डॉ. मकरंद फडके यांच्या माध्यमातून गोगटे दांपत्य समितीशी जोडले गेले आहे. समितीची माहिती त्यांना डॉ. फडके यांच्याकडून मिळाली. त्यांनी समिती पाहिली नव्हती, त्यावेळी नवीन वसतिगृहाची इमारतही उभारली नव्हती. तरी केवळ विश्वासाने त्यांनी देणगी दिली, असे डॉ. फडके यांनी सांगितले.



### एपिरॉकच्या सहकार्याने साकारले ग्रंथालय

एपिरॉक मायनिंग इंडिया प्रा. लि. यांच्या आर्थिक साहाय्यातून मुलींच्या नवीन वसतिगृहात सुसज्ज ग्रंथालय उभारण्यात आले आहे. एपिरॉक मायनिंग इंडियाचे अध्यक्ष अरुण गोविंदराजन व उपाध्यक्षा ऑलिव्हीया लोन्ह्विक यांच्यासह समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते या ग्रंथालयाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी एपिरॉकचे डिजिटल बिझनेस लाईन मॅनेजर अमित रणदिवे, ब्रॅण्डिंग अँड कम्युनिकेशन हेड चंदना एम., लीगल हेड आशिष जैन, सीएसआर अधिकारी धनाजी पुरी, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर उपस्थित होते. अरुण गोविंदराजन म्हणाले, “विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम व अवांतर वाचनासाठी ही एक चांगली सुविधा निर्माण झाली आहे. 'एपिरॉक'ने ग्रंथालय उभारण्यासह दोन खोल्यांसाठी योगदान, तसेच येथील गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात आहे. पुढील काळात आणखी योगदान देण्यासाठी उत्सुक आहोत.” ऑलिव्हीया लोन्ह्विक यांनीही मनोगतात समितीच्या कार्याचे कौतुक केले.  ज्येष्ठ कार्यकर्ते प्रदीप मांडके यांनी समितीमध्ये होत असलेल्या कार्याची माहिती दिली. ज्योती गोगटे यांनी आभार मानले.






### दिवाळी निधी समितीकडे सुपूर्त

समितीतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून दिवाळीच्या सुटीत दिवाळी निधी संकलन योजना राबविण्यात येते. सुटीत गावाला गेल्यानंतर तेथील लोकांना, नातेवाईक, परिचितांना समितीविषयी माहिती देऊन निधी संकलन करायचे असते. समितीची माहिती गावोगावी पोचविण्याबरोबरच निधी संकलन करताना येणाऱ्या अडचणी विद्यार्थ्यांच्या लक्षात याव्या, तसेच समितीच्या कार्यात त्यांचाही खारीचा वाटा असावा, या उद्देशाने ही योजना राबविली जाते. यंदा एकूण २४ लाख ५० हजार एवढा निधी विद्यार्थ्यांनी जमा केला. निधीचा धनादेश समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार व खजिनदार संजय अमृते यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.

### जागतिक उद्योजकता परिषदेत विद्यार्थ्यांचा सहभाग

पुण्यात १० व ११ जानेवारीला जागतिक उद्योजकता परिषद झाली. समितीच्या ५० आजी- माजी विद्यार्थ्यांना या परिषदेत सहभाग घेण्याची संधी मिळाली. तेथे समितीचा स्टॉलही होता. या परिषदेचे आयोजन पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी, गर्जे मराठी आणि महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांनी केले होते. देश- विदेशातील अनेक दिग्गज परिषदेला उपस्थित होते. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी त्यांच्या  भाषणात समितीचा उल्लेख केल्याने अनेकांनी समितीच्या स्टॉलला आवर्जून भेट देऊन समितीचे कार्य जाणून घेतले. अनेकांशी प्रत्यक्ष संवाद साधता आला. शेवटच्या सत्रात विश्वस्त मकरंद फडके यांनी समितीच्या कार्याविषयी सर्व उपस्थितांना माहिती दिली.






### हणमंतराव गायकवाड यांच्या हस्ते प्रजासत्ताकदिनी ध्वजवंदन

देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन समितीत उत्साहाने साजरा करण्यात आला. मुलींच्या नवीन वसतिगृहाच्या आवारात ध्वजवंदन झाले. भारत विकास ग्रुपचे (बीव्हीजी) संस्थापक, व्यवस्थापकीय संचालक हणमंतराव गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्वोत्तमाचा ध्यास घेऊन त्याला परिश्रमाची जोड दिली तर यश तुमचेच आहे, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. ग्रामीण भागातून येऊन, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कसे यश मिळवले हा त्यांचा प्रवास सांगितला. बीव्हीजी ब्रँड होण्यामध्ये सहकाऱ्यांचे अथक परिश्रम आहेत, असेही त्यांनी सांगितले. सुमित्रा सदन वसतिगृहात विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे, डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात विश्वस्त डॉ. मकरंद फडके, लजपत भवनमध्ये सल्लागार, कार्यकर्ते श्रीधर राजपाठक यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा

प्रजासत्ताक दिनानिमित्त समितीतील विद्यार्थी- विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात व्यंगचित्र, छायाचित्रण, हस्ताक्षर, रांगोळी, पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल- प्रॉडक्ट प्रेझेंटेशन अशा स्पर्धा झाल्या. त्यात मुलामुलींना मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



*विद्यार्थी साहाय्यक समितीला राजमाता जिजाऊ आदर्श पालक पुरस्काराने गौरविण्यात आले. १२ जानेवारीला झालेल्या कार्यक्रमात समितीच्या विश्वस्त विनया ठोंबरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.*

## सीए कल्पना दाभाडे यांचा युवकांशी संवाद



सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील घारेवाडी येथील शिवम प्रतिष्ठान दरवर्षी बलशाली युवा हृदय संमेलन भरवते. पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी देशभरातून नामांकित व्यक्तींना पाचारण केले जाते. यावर्षी सीए कल्पना दाभाडे यांना या संमेलनासाठी निमंत्रित केले होते. त्यांनी "जीवनाच्या ताळेबंद जुळवताना" या विषयावर युवकांशी संवाद साधला. व्यक्तिगत संघर्षातून त्यांनी मिळविलेल्या यशाचा प्रवास या संवादातून उलगडला गेला. कल्पना दाभाडे ह्या समितीच्या माजी विद्यार्थिनी असून आता समितीच्या सीए आहेत.

## विद्यार्थ्यांनी तयार केले विविध स्वादाचे पराठे

विद्यार्थी विकास केंद्र आयोजित बुवाजी सहस्रबुद्धे पाककला स्पर्धा- २०२५ मुलींच्या नवीन वसतिगृहात १२ जानेवारीला झाली. त्यात ६४ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी "पराठा" तयार करायचा होता. भोपळा, मेथी आणि पालक पराठा असे पर्याय होते. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या सर्जनशीलतेचा पूर्ण उपयोग करून पराठे तयार केले. स्पर्धेचे परीक्षण श्रीमती सीमा होस्कोटे श्रीमती भावना महाजन व श्री. निसार चौगुले यांनी केले. विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



## सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत बाजीप्रभू विद्यालयात स्पर्धा

सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत डॉ. अच्युतराव आपटे यांच्या स्मृतिदिनानिमित्त १२ जानेवारीला गोखलेनगरमधील वीर बाजीप्रभू विद्यालयात चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दोन गटांत झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत पहिली ते सातवीतील एकूण ३२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. समितीचे विद्यार्थी ओंकार शिंदे व जीवन बोधले यांनी परीक्षकाची भूमिका बजावली. चित्रकला स्पर्धाही दोन गटांत झाली. त्यामध्ये एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# मुलांमधील आत्मविश्वास वाढला

## आईवडिलांची भावना, मेळाव्याला गावोगावचे पालक उपस्थित

समितीत होणारे विविध कार्यक्रम, उपक्रम यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला. समितीत राहत असल्याने मुली सुरक्षित असल्याचा विश्वास आहे, त्यामुळेच दूर अंतरावरील छोट्या गावात आम्ही शांतपणे झोपू शकतो, काळजी वाटत नाही, अशी भावना समितीतील विद्यार्थी- विद्यार्थिनींच्या पालकांनी व्यक्त केली.

प्रजासत्ताक दिनी समितीतील पालकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. राज्यभरातून वेगवेगळ्या गावांतून पालक या मेळाव्यात सहभागी झाले होते. त्यापैकी काही पालकांच्या प्रातिनिधिक प्रतिक्रिया...



समितीत मुलांना घरच्यासारखी वागणूक दिली जाते आणि येथे घरासारखेच वातावरण आहे. तसेच, समितीकडून विद्यार्थ्यांना आर्थिक मदतही मिळते, त्यामुळे आम्हालाही मुलांची काळजी वाटत नाही.

**- राणी माने,** राहुल माने याची आई
लजपत वसतिगृह



समितीने गावाकडून आलेल्या विद्यार्थ्यांना आपले मत मांडण्यासाठी एक मंच उपलब्ध करून दिला आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे, आणि याचा उपयोग त्यांना पुढील आयुष्यात नक्कीच होईल.

**- ऐश्वर्या कुलकर्णी,** स्वामिनी कुलकर्णी हिची बहिण
सुमित्रा सदन वसतिगृह



समितीची प्रवेश प्रक्रिया अत्यंत पारदर्शी आहे. येथे सहजासहजी प्रवेश मिळत नाही, फक्त गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जातो.

**- सुनिल अहिरराव,** पूर्वा अहिरराव हिचे वडील
मुलींचे नवीन वसतिगृह B विंग



पुण्यात आमची मुलगी विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये राहते, म्हणून आम्ही पुण्यापासून ४०० किमी दूर असलेल्या आमच्या घरी निर्धास्त आणि शांत झोपू शकतो. समितीत राहणं ही खूप मोठी गोष्ट आहे.

**- प्रमोद कुलकर्णी,** स्नेहल कुलकर्णी हिचे वडील
मुलींचे नवीन वसतिगृह B विंग



समितीमधील कमवा आणि शिका, पाल्य पालक, दररोज अर्धा तास काम, विद्यार्थी विकास केंद्रातील कार्यक्रम या मुळे विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन होत आहे. उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे.

**- धोंडीभाऊ म्हस्के,** प्रणवी म्हस्के हिचे वडील
मुलींचे नवीन वसतिगृह, B विंग

## कमवा- शिका योजनेतील १४ विद्यार्थ्यांचा गौरव

कमवा व शिका उपसमिती विभागाअंतर्गत कै. अविनाश दिगंबर ठोंबरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आणि श्री. वैभव अविनाश ठोंबरे यांच्या जन्मदिनानिमित्त ४ जानेवारीला डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृहात उत्कृष्ट कमवा व शिका करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्रीमती विनया ठोंबरे, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, राजेंद्र ततार उपस्थित होते.

समितीच्या ७ वसतिगृहांमधून प्रत्येकी दोन अशा १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. श्रीमती विनया ठोंबरे यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना पारितोषिक स्वरूपात रोख रक्कम तसेच प्रमाणपत्र देण्यात आले.





## शेतीतून उद्योजकतेचे विद्यार्थ्यांना मिळाले धडे

मुलींच्या नवीन वसतिगृहात पुनरुत्पादक फायदेशीर शेती या विषयावर ४ जानेवारीला कार्यक्रम झाला. शेतीतून उद्योजकता कशी साधता येते, याबाबत मार्गदर्शन माधुरी देशपांडे व गुलाब घुले यांनी केले. या दोघांनी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. या कार्यक्रमाला पाचही वसतिगृहांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, समितीचे कार्यकर्ते व पर्यवेक्षक पर्यवेक्षिका उपस्थित होते. डॉ. ज्योती गोगटे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी एक प्रेरणादायी लघुपट दाखवला गेला. माधुरी देशपांडे यांनी "एसपीके नैसर्गिक शेती" कशी करायची याबद्दल सादरीकरण केले. त्यांनी शेतीमधून उद्योजकता कशी साधता येते, याचे उत्कृष्ट उदाहरण दिले.

गुलाब घुले यांनी शेतीमधील काही महत्त्वाचे प्रयोग व त्यांचे यशस्वी परिणाम सांगितले. त्यांच्या अनुभवांच्या गाभ्यातून नैसर्गिक शेती आणि उद्योजकतेचा कसा सांगोपांग संबंध आहे, हे स्पष्ट झाले.

### विद्यार्थ्यांनी अभ्यासली सेंद्रिय शेती

११ जानेवारीला खेड शिवापूरमधील शिवाई अॅग्रो टुरिझम येथे अभ्यास सहल आयोजित केली होती. श्री. घुले यांनी सेंद्रिय शेतीचे नंदनवन फुलवलेले आहे.





## बारामतीच्या अभ्यास सहलीत आधुनिक शेतीचा अनुभव

आधुनिक शेती आणि तंत्रज्ञानाची ओळख करून घेण्यासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या उद्योजकता विकास केंद्रांतर्गत बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राच्या कृषिक प्रदर्शन पाहण्यासाठी १९ जानेवारीला अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सहल केवळ अनुभव शिक्षण देणारी नव्हे, तर विद्यार्थ्यांना प्रगतीशील विचारांची प्रेरणा देणारी ठरली.


कृषी विज्ञान केंद्रात सेंद्रिय शेती, नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग आणि आधुनिक उपकरणांची माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांना अधिक स्वयंचलित आणि जलद प्रक्रिया करण्यासाठी उपयुक्त अनेक उपकरणे प्रदर्शनात पाहायला मिळाली. शेतीतील आव्हानांना तोंड देण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स कसा उपयुक्त ठरतो, याची सखोल माहिती मिळाली. कीड नियंत्रण, मृदा परीक्षण, हवामान अंदाज आणि पाणी व्यवस्थापन यामध्ये एआय तंत्रज्ञान कसे वापरले जाऊ शकते, याची प्रात्यक्षिके पाहायला मिळाली.

सहलीच्या दुसऱ्या टप्प्यात आप्पासाहेब पवार सायंटिफिक रिसर्च इन्स्टिट्यूटला भेट दिली. येथील इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटरमध्ये शेती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवकल्पना आणि संशोधन प्रक्रियेची माहिती मिळाली.

# तेथे कर माझे जुळती !

**तयाचा वेलू...**

समितीच्या संस्कारातून घडलेली अनेक मुले आजही या मूल्यांची जपणूक करत जीवनाची यशस्वी वाटचाल करत आहेत. कोणी व्यवसायात प्रगती केली आहे, तर कोणी मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहे. अशाच माजी विद्यार्थ्यांची यशोगाथा सांगणारे सदर...



**सुरेखा भणगे,**
**सहाय्यक आयुक्त, पुणे महापालिका**



*समितीत असताना ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ पु. ग. वैद्य यांच्या हस्ते बक्षीस स्वीकारताना.*

'माझ्यावर विद्यार्थी साहाय्यक समितीचे संस्कार आहेत, मी काय करायचं ते मी ठरवीन ...तुम्हाला काय व्हायचंय, करायचंय ते तुम्ही ठरवा!" समोरच्या कोणत्याही माणसाला हे ठणकावून सांगण्याचं बळ असलेल्या पुणे महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त!

आज मी जी काही आहे, त्यात समितीचा सर्वाधिक वाटा आहे, हे सांगताना त्यांचा ऊर समितीबद्दलच्या अभिमानाने आणि डोळे तिथल्या आठवणींनी भरून आले!

समिती हॉस्टेलमध्ये आल्याचा पहिला दिवस त्यांच्या डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा राहिला. 'खोली दाखवली तेव्हा आपल्यासाठी असलेली स्वतंत्र कॉट, टेबल खुर्ची, बेडशीट, उशी आणि दिवे- पंखे बघताना, खेडेगावात, गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मुलीला काय वाटत असेल? गरीब घरातली मुलं आहेत, द्या त्यांना काहीही, असा विचार नाही करत ते!' सुरेखाताईंची भाषा अतिशय अलंकारिक, पण मनापासूनची... "खेड्यातून निवडून घेतलेली ही बीजं चांगली रुजली पाहिजेत, फुलली- फळली पाहिजेत, त्यासाठी जितकं उत्तम त्यांना देता येईल, ते दिलं पाहिजे, हा व्यवस्थापनाचा विचार! रोज दूध, कडधान्य, दोन वेळा पौष्टिक जेवण, सत्त्वीची योगासनं... समितीमधलं प्रत्येक मूल समर्थपणे आपल्या क्षेत्रात उभं आहे. गेली कित्येक वर्षे हे अथक चालू आहे, असं हॉस्टेल मला तरी दुसरं कुठलंच माहिती नाही."

समितीच्या विद्यार्थी विकास केंद्राने नवनवीन संधी दाखवून दिल्या, आपले गुण दाखवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिलं, कमवा- शिका योजनेने हक्काचे पैसे दिले, पाल्य- पालक योजनेमुळे सुसंस्कृत शहरी लोकांचा सहवास मिळाला. समितीची प्रत्येक योजना अतिशय विचारांती बनवलेली आहे. त्याचा उद्देश समजून घ्या आणि मनापासून वापर करा, हा सल्ला त्यांनी नवीन विद्यार्थ्यांना आवर्जून दिला. त्या म्हणाल्या, समितीच्या प्रत्येक देणगीदाराच्या मदतीमुळे आपल्याला कुठलीतरी सुविधा मिळते, याची कायम जाणीव आणि कृतज्ञता ठेवली पाहिजे.

## पाल्य- पालक योजनेची हृद्य आठवण

"माझे पालक होते श्री. रामकृष्ण पांढरे. त्यांनी मला त्यांच्या नातीसारखंच वागवलं. समाजात कसं राहायचं, वावरायचं सगळं त्या दोघांनी मला शिकवलं. इंग्लिश बोलण्याचा सराव करून घेतला. त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. समिती सोडल्यावर कुठे राहावं, असा प्रश्न पडला, तेव्हा त्यांनी मला त्यांच्या घरीच ठेवून घेतलं. त्यांची मुलं परदेशी. त्यांना जेव्हा तिकडं जायचं होतं, तेव्हा त्यांनी घराची जबाबदारी माझ्यावर सोपवली. माझ्यावर विश्वास दाखविला. नंतर मी विद्यापीठाच्या हॉस्टेलमध्ये राहायला गेले तरी त्यांच्याशी संपर्क ठेवला. त्यांच्या अडीअडचणीला मला शक्य ती मदत करत राहिले. तेही माझ्या यशात आनंद मानत राहिले, एक दिवस मला एक फोन आला अनोळखी नंबरवरून... मी हॉस्पिटलमधून पांढरे सरांकडून बोलतो आहे. ते गेले. मी जेव्हा विचारलं की, माझा नंबर कसा मिळाला, त्यावर ते म्हणाले, त्यांनी मला कालच दिला आणि सांगितलं की, मी गेलो तर हिला फोन कर. माझी मुलं येईपर्यंत ही माझी पुढची व्यवस्था करेल." आता ही आठवण सांगताना सुरेखाताईंच्या डोळ्यात पाणी आलं. त्या म्हणाल्या, "तेव्हाच मला जुळी बाळं झाली होती, घरातून बाहेर पडणं शक्य नव्हतं. पण माझे यजमान आणि भाऊ त्यांच्या मदतीला गेले. मी माझ्या ओळखीच्या लोकांना सांगून त्यांची मुलं येईपर्यंत त्यांचा सांभाळ केला. आयष्याच्या शेवटच्या क्षणात त्यांना माझी आठवण झाली आणि आपणही ते नातं शेवटपर्यंत निभावू शकलो, याचं मला खूप समाधान आहे."

सुरेखाताईंनी समितीमध्ये राहून पदवी मिळवली. मग अर्थशास्त्रात एमए, ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंटमध्ये एमबीए, नंतर एमपीएससीची परीक्षा देऊन त्या आता महाराष्ट्रात सरकारी अधिकारी आहेत. खालापूरमध्ये आदिवासींसाठी दीडशे घरकुलांचा प्रकल्प, कोविड काळात लॉकडाऊन दरम्यान त्यांच्या कार्यक्षेत्रातल्या हातावर पोट असणाऱ्या माणसांची घेतलेली काळजी, माथेरानमधील नागरिकांची पर्यावरणपूरक वाहतुकीची सोय झालीच पाहिजे म्हणून सर्वोच्च न्यायालयापर्यंत दिलेला यशस्वी लढा, अशी त्यांची काही विशेष आणि त्यांना समाधान देणारी कामगिरी आहे. अतिशय कार्यतत्पर आणि स्वच्छ अधिकारी म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. "माझ्याकडे जर मदत करण्याचे अधिकार आहेत आणि ती जबाबदारी आणि त्यासाठी लागणारी मदत शासन मला उपलब्ध करून देत आहे, तर मी ती न करून कसं चालेल किंवा मी ती का करणार नाही? इतकी साधी सरळ विचारसरणी मला समितीमुळेच मिळाली," हे त्या सांगतात. 'सरकार देतं तो पगार मला पुरतो, माझ्या मुलांना मला चांगले संस्कार द्यायचे आहेत, मग मी कोणा इतरांचे पैसे काय म्हणून घेऊ? आणि त्यामुळे मी हक्कानं चांगलं काम करून घेऊ शकते."

त्यांची ऊर्जा, सकारात्मकता, संभाषण कौशल्य, आपण मनात आणू ते करू शकतो हा आत्मविश्वास कौतुकास्पद आहे.


ऑफिसच्या जबाबदाऱ्या सांभाळून आपल्या जुळ्या बाळांची काळजी घेताना सुरेखाताई अजिबात थकत नाहीत. त्यांचा उत्साह, आत्मविश्वास, प्रगती ह्या सगळ्याचं श्रेय त्या समिती, निर्मलाताई पुरंदरे, प्रभाकर पाटील सर यांना कृतज्ञतेनं देतात. सुरेखाताईंचे कर त्यांच्यासमोर जुळलेले आहेत आणि आपले त्यांच्यासारख्या आपलं आयुष्य सुकर करणाऱ्या कर्तृत्ववान अधिकाऱ्यांसमोर..!

**(शब्दांकन : माधवी कुलकर्णी)**

**मैत्री पुस्तकांशी**

## योग्य विचारांतून समृद्ध जीवन

**- पूजा चौधरी**




Think and grow rich (योग्य विचारातून श्रीमंत समृद्ध जीवनाकडे) हे अमेरिकन लेखक नेपोलियन हिल यांनी लिहिलेले पुस्तक सन १९३७ मध्ये प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक अनेक भाषांमध्ये उपलब्ध आहे. पुस्तकाचा मराठी अनुवाद डॉ. कमलेश सोमण यांनी केला आहे.

नेपोलियन यांनी या पुस्तकासाठी जवळपास ५०० श्रीमंत व्यक्तींची मुलाखत घेतली आहे. यात हेन्री फोर्ड, चार्ल्स डिकन्स, शुमन हिंक, थॉमस एडिसन, आर्थर नॅश, एडविन बार्नस, वुड्रो विल्सन, डॉ. अलेक्झांडर ग्राहम बेल आदींचा समावेश आहे.


नेपोलियन यांनी 'विचार' या शब्दावर जोर दिलेला आहे, कारण विचारच व्यक्तीला चांगल्या किंवा वाईट दिशेला घेऊन जातात. योग्य विचार, योग्य वेळी, योग्य ठिकाणी करण्यातून माणूस श्रीमंत- महान होऊ शकतो. फक्त धनदौलतच नव्हे तर आनंद, सुख, समृद्धी या दृष्टीने सुद्धा. आपण जसा विचार करतो तसे आपण असतो आणि बनतो. तीव्र इच्छा असणे म्हणजे अर्धे यश मिळवल्यासारखे असते, इच्छा ही व्यक्तीला प्रबळ बनवत असते, आपण घेतलेल्या निर्णयावर, विचारांवर दृढविश्वास व श्रद्धा असायला हवी, बदल करायचा असेल तर सर्वप्रथम व्यक्तीने स्वतःमध्ये बदल घडवले पाहिजे, असा संदेश लेखकाने दिला आहे.

ज्यांना आपल्या आयुष्यात खूप काही करायचे आहे, मोठे बनायचे आहे, श्रीमंत व्हायचे आहे, त्यांनी आवर्जून हे पुस्तक वाचावे.

**पुस्तकाचे नाव-**
**THINK AND GROW RICH**
**लेखक-**
**नेपोलियन हिल**

## मित्रांना जिंकण्यासाठी मार्गदर्शन

**- पर्णवी शिवाजी म्हस्के**




मजबूत नातेसंबंध निर्माण करण्यासाठी आणि इतरांवर प्रभाव टाकण्यासाठी डेल कार्नेगी यांनी लिहिलेले मित्र कसे जिंकायचे आणि लोकांवर प्रभाव कसा टाकायचा? हे पुस्तक मार्गदर्शक आहे. मित्रांची खरी आवड ओळखून त्यांना आपल्यासारखे कसे बनवायचे, हे लेखक शिकवतो. तो लोकांची नावे लक्षात ठेवण्यावर आणि एक चांगला श्रोता असण्यावर भर देतो. तुमच्या विचारसरणीवर लोकांना कसे जिंकता येईल, याच्या टीप्स पुस्तकात वाचायला मिळतात. कार्नेगी युक्तिवाद टाळण्याचा सल्ला देतात, इतरांच्या मतांचा आदर करतात. जेव्हा तुम्ही चुकीचे असता तेव्हा मान्य करा, असे ते सांगतात. एक चांगला नेता कसा असावा, हेही ते सांगतात. इतरांचे कौतुक केले पाहिजे आणि इतरांच्या कमकुवतपणावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्यांची ताकद ओळखून त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे, असे ते म्हणतात. पुस्तकात व्यावहारिक टिप्स आणि वास्तविक जीवनातील उदाहरणे आहेत, जी तुम्हाला तुमचे वैयक्तिक किंवा व्यावसायिक संबंध सुधारण्यास मदत करतील.

**पुस्तकाचे नाव-**
**मित्र कसे जिंकायचे आणि लोकांवर प्रभाव कसा टाकायचा? (हाउ टू विन फ्रेंड्स एंड इन्फ्लुएंस पीपल)**
**लेखक-**
**डेल कार्नेगी**

# पुणतांबेकर, देशपांडे यांचा सन्मान

## वसुधाताई परांजपे स्मृती पुरस्कारांचे प्रा. जोशी यांच्या हस्ते वितरण

सामाजिक वातावरण प्रदूषित होत असताना ते स्वच्छ करण्याचे काम करणाऱ्या दोन महिलांचा सत्कार होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. अंतःप्रेरणेतून निर्माण होणारे काम शाश्वत असते, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले.

समितीच्या माजी कार्यकारी विश्वस्त वसुधाताई परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा समाजसेवा पुरस्कार मुक्तांगण पुनर्वसन केंद्राच्या संचालक मुक्ता पुणतांबेकर तर शिक्षणसेवा पुरस्कार जीवितनदी संस्थेच्या संस्थापक, संचालक शैलजा देशपांडे यांना देण्यात आला. पुरस्कारांचे वितरण १५ जानेवारीला प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. ५० हजार रुपये रोख व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. यावेळी प्रा. प्र. ना. परांजपे यांच्यासह परांजपे कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी परांजपे कुटुंबीयांच्या वतीने समितीतील पाच विद्यार्थिनींना प्रत्येकी १० हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात आली. दिव्या कुलकर्णी, साक्षी मोरे, राधा गडशिला, तन्मयी मोरे, सानिका दांगट या शिष्यवृत्तीच्या मानकरी ठरल्या. पुरस्कारार्थींचा परिचय उज्वला बर्वे व विजया देव यांनी करून दिला. कार्यक्रमाला समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर तसेच विश्वस्त, कार्यकर्ते उपस्थित होते. सानिका जोशी यांनी सूत्रसंचलन केले.





## पोलीस निरीक्षक सावंत यांचे मुलींना मार्गदर्शन

डॉ. अच्युतराव आपटे यांच्या स्मृतिदिनानिमित्त ७ जानेवारीला डॉ. आपटे वसतिगृहामध्ये Accountability and Responsibility या विषयावर सत्र झाले. यात पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी मार्गदर्शन केले.

दामिनी पथकाच्या मार्शल सोनाली हिंगे, मार्शल साधना भोसले, समन्वयक कुंदन पठारे, पर्यवेक्षिका सौ. संगीता गरवे आणि समितीतील विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या. नोकरीमध्ये पगार बीजगणितीय पद्धतीने मिळतो तर बिझनेस मध्ये पैसे भूमीतीय पद्धतीने मिळतात असे सांगून उद्योजकतेकडे वळा, असा सल्ला त्यांनी दिला.